# Arts and Commerce College, Mayani (Dist. Satara)

# DVV Documents

Criteria 2

**Teaching Learning and Evaluation**

| 2.1.2 |
| --- |
| Percentage of Seats Filled Against Reserved Categories (SC, ST, OBC, etc.) As Per Applicable Reservation Policy for the First-Year Admission During the Last Five Years |

9. Government Resolution Indicating Women Reservation

200408111303040001-2402

**महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी ३०टक्के आरक्षण ठेवण्याबाबत**

# *महाराष्ट्र शासन*

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**शासन निर्णय क्र. जीईसी-१०००/(१२३/२०००)/तांशि-१**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक: १७ एप्रिल, २०००

**प्रस्तावना:-**

भारताच्या संविधानात, स्त्री-पुरूष भेद न ठेवता समानतेचे तत्व हा नागरीकांचा मूलभूत हक्क मानण्यात आला आहे. तसेच महिलांच्या बाबतीतही घटनेत सकारात्मक धोरण स्विकारण्यात आले आहे. महिलांना पुरूषांच्या बरोबरीने संधी देणे अपेक्षित असले तरी विविध शिक्षण अभ्यासक्रमाकरिता स्त्रियांना समान संधी प्रत्यक्षात मिळत नाही. स्त्रियांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्यादृष्टीने खरा प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यानुसार महिलांचे बलशालीकरण आणि समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग करून सर्वांगीण मानवी विकासाच्या विविध क्षेत्रामध्ये सकारात्मक परिणाम घडवून आणण्यासाठी महिलांच्या शिक्षणाकडे जाणिवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन शासन निर्णय दि.२२.६.१९९४ अन्वये शासनाने महिलांना शासकीय नोकरीमध्ये ३०टक्के जागा आरक्षित ठेवल्या आहेत. यामागील खरा हेतू साध्य होण्याकरिता आता महिलांना पदवी अभ्यासक्रमाकरिता ३०टक्के आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात पदवी स्तरावरील सर्व अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी ३०टक्के आरक्षण ठेवण्याबाबत शासनाचा विचार होता.

**शासन निर्णय:-**

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता महिलांसाठी ३०टक्के आरक्षण ठेवण्यात येत आहे.

सदरचे आरक्षण बिनराखीव व राखीव या दोन्ही प्रवर्गासाठी लागू राहील. जर बिनराखीव जागा १०० असतील तर त्यापैकी ३० जागा महिलांकरिता आरक्षित राहतील.

तसेच सदरचे आरक्षण हे सध्या विविध सामाजिक प्रवर्गाकरिता विहित केलेल्या संविधानात्मक राखीव जागा अंतर्गत समांतर आरक्षण (Horizontal)राहील. उदाहरणार्थ जसे की, सध्या संविधानातील तरतुदीनुसार शासनाने अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता १३ टक्के जागा आरक्षित आहेत. त्यापैकी त्यातील ३०टक्के आरक्षण हे अनुसूचित जाती या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिताच ठेवण्यात येईल व जर या प्रवर्गातील किमान पात्रता असलेल्या महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास त्या जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पुरूष संवर्गातून भरण्यात येतील. म्हणजेच जर प्रवेशाकरिता एखाद्या विद्याशाखेसाठी प्रथम वर्षासाठी १०० जागा असतील तर त्यापैकी १३ जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता सध्या असलेले आरक्षण विचारात घेऊन त्यापैकी ३०टक्के म्हणजेच ४ जागा हया अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिता आरक्षित राहतील.

वर उल्लेखिलेल्या प्ध्दतीनेच इतर सर्व प्रवर्गाकरिताही सध्या असलेल्या आरक्षणांतर्गत महिलांना ३०टक्के समांतरपणे आरक्षण ठेवण्यात येईल. तसेच ज्या पदवी अभ्यासक्रमांकरिता मूल्यभारीत व मुक्त जागांवर देण्यात येतात ह्या प्रवेशा अंतर्गत देखील ३०टक्के आरक्षण महिलांकरिता देण्यात येईल.

सध्या सर्व तंत्र निकेतनांमध्ये पदविका अभ्यासक्रमासाठी महिलांकरिता शासन निर्णय क्र.डब्ल्युबीपी-१०९५/(२७१९)/व्यशि-५, दि.१७.१.१९९६ अन्वये ठेवलेल्या २५ टक्के आरक्षणात वाढ करून आता ते ३०टक्के इतके करण्यात येत आहे..

सदरच्या आरक्षित जागांवर जर महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर या रिक्त जागा त्याच शैक्षणिक वर्षात पुरूष संवर्गातून भरण्यात येतील व या रिक्त जागांचा त्या पुढील शैक्षणिक वर्षात अनुशेष धरला जाणार नाही.

वैद्यकीय शिक्षण विभाग आणि कृषि व पदुम विभागांतर्गत येणाऱ्या सर्व पदवी अभ्यासक्रमांकरिता आदेश संबंधित विभागांकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदरचे आरक्षणविषयक आदेश शैक्षणिक वर्ष सन २०००-२००१ पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्र. ह. क्षीरसागर)
शासनाचे सहसचिव

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, उद्योगधंदे-संस्था-समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विद्यापीठांचे कुलगुरू व कुलसचिव
सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये.
प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र महाविद्यालये, तंत्र निकेतने व संस्था (तंत्र शिक्षण संचालकांमार्फत)
प्राचार्य, सर्व वरिष्ठ महाविद्यालये (उच्च शिक्षण संचालकांमार्फत)
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव.
मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
मा. सचिव, कृषि यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव, शालेय शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक,
मा. प्रधान सचिव, वित्त यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव (सर्वसाधारण उपविभाग), सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखाली येणारी सर्व विभागीय कार्यालये (संबंधित विभागामार्फत)